धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

स्थायी समिती सभा क्रमांक ३५

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक ०१/०८/२०२५ सकाळी ११-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	पदनाम
१.	श्रीमती अमिता दगडे-पाटील	आयुक्त तथा प्रशासक
२.	श्रीमती करुणा डहाळे	अति. आयुक्त
३.	श्री हेमंत निकम	उपायुक्त
४.	श्रीमती शोभा बाविस्कर	उपायुक्त
५.	श्रीमती स्वालिया मालगावे	करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी
६.	श्री शाहेद शेख मो. शेख	मुख्य लेखापरीक्षक
७.	श्री सुनिलकुमार सुर्यवंशी	उपमुख्यलेखापरीक्षक
८.	श्री.मनोज वाघ	नगरसचिव
९.	श्रीमती वर्षा घुगरी	कार्य. अभियंता बांधकाम
१०.	श्री नवनित सोनवणे	कार्य. अभियंता पाणीपुरवठा
११.	श्रीमती संपदा कुलकर्णी	प्र.आरोग्याधिकारी
१२.	श्री चंद्रकांत मोरे	लेखा विभाग
१३.	श्री राजेंद्र माईनकर	प्र. भांडारपाल
१४.	श्री के.डी साबळे	लिपीक आस्थापना विभाग
१५.	श्री.लक्ष्मण पाटील	प्र.सहा.आरोग्याधिकारी
१६.	श्री चंद्रकांत जाधव	प्र. मलेरीया पर्यवेक्षक
१७.	श्री राजेश वसावे	मुख्य स्वच्छता निरीक्षक
१८.	श्री.चंद्रकांत उगले	उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग
१९.	श्री प्रदीप चव्हाण	उप अभियंता, बांधकाम
२०.	श्री एन.के. बागुल	उप अभियंता, विद्युत विभाग
२१.	श्री प्रकाश सोनवणे	उप अभियंता नगररचना
२२.	श्री कमलेश सोनवणे	सहा. अभियंता नगररचना
२३.	श्री हेमंत पावटे	सहा. अभियंता बांधकाम
२४.	श्री मधुकर निकुंभे	मालमत्ता व कर विभाग
२५.	श्री प्रसाद जाधव	अतिक्रमण अधिक्षक
२६.	श्री संभाजी सुडके	लिपीक शिक्षणमंडळ
२७.	श्री.रविकिरण पाटकरी	प्र.वृक्षसमिती प्रमुख
२८.	श्रीमती कल्पना जाधव	अभिलेखापाल

म.नगरसचिव	वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

मा.प्रशासक:-	आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-५५७ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मुख्य लेखापरिक्षक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 105(1) अन्वये साप्ताहिक लेखा तपासणी अहवाल मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे. यात एक बाब निदर्शनास आणुन देवु इच्छीतो बऱ्याचशा विभागप्रमुखांकडुन ज्या वेळी लेखातपासणी अहवाल दिला जातो त्यामध्ये काही बाबी ज्या असतात त्यामध्ये अधिकचे स्पष्टीकरण संबंधीत विभागाकडुन आम्हाला अपेक्षीत असते, ते दिले जात नाही. त्याअनुषंगाने अर्ध समास उददेश हा असतो की त्या विभागाने स्पष्टीकरण द्यावे, जेणेकरुन त्यांची बाजु लेखा परिक्षणासमोर यावी. बहुतांश वेळी संबंधीत विभागाकडुन प्रतिसाद दिला जात नाही, त्यामुळे अडचणी येतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक सो. याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. यात नगररचना संबंधी विषय आहे, बांधकाम सेसची रक्कम शासनाला भरतो त्यासंदर्भात आहे. मालमत्ता करा संदर्भात काही विषय आहे. जेवढया जेवढया विभागांना अर्धसमास इश्यु होतील त्यांची पुर्तता करणे त्या त्या विभागाचे काम आहे. प्रत्येकाने वेळेत ते पुर्ण करावेत. यामध्ये सुसुत्रता येते. काही कागदपत्रे जोडावयाची राहिली असेल ते जोडावी. संबंधीत विभागाने याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. हे जर रेक्टीफाय करत गेले तर ॲन्युअल लोकल फंडचे जे ऑडीट होत त्यामध्ये येणाऱ्या अडचणी कमी होतील. तसेच मुख्य लेखा परिक्षक सो. यांचे एक रिपोर्ट सादर करावे. अति. आयुक्त मॅड्म यासंबंधी एक बैठक घ्यावी. तुमच्या विभागाशी संबंधीत विषय आहे, आणि काय प्रलंबीत आहे आणि कुठल्या कुठल्या विषयावर काम करावे लागेल ते पाहुन घ्या. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३५ दिनांक ०१/०८/२०२५

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०२/०६/२०२५ ते दि. ०६/०६/२०२५ पर्यत तसेच दि.०९/०६/२०२५ ते दि. १३/०६/२०२५ व दि. १६/०६/२०२५ ते दि. २०/०६/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २३/०६/२०२५ ते दि. २७/०६/२०२५ तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने सादर केलेल्या अर्धसमास पत्रांबाबत तातडीने अनुपालन करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत संबंधित उपायुक्त व संबंधित विभाग यांनी अनुपालनाबाबत वेळोवेळी बैठक घेऊन आवश्यक ती पूर्तता करावी.

तसेच लेखापरीक्षण विभागाने संबंधित विभागांशी समन्वय ठेऊन कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५५८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील लेख्यावरील लेखापरीक्षण अहवाल (भाग-१/२) मान्यतेस्तव सादर.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मुख्य लेखा परिक्षक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये मनपाच्या सन २०२३-२४ याआर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवाल (भाग 1) यात हा संपुर्ण वर्षाचा अहवाल नाही पण या लेखापरिक्षण अहवालाचा भाग १ आहे, तो मे. स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे. यासंदर्भात विवेचन असे की, नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ याय कालावधीत लेखा परिक्षण अहवाल तयार करण्यात आलेला आहे. यात मनपाचे सर्व विभाग कव्हर झाले नाही. यात केवळ मनपाचा बाजार विभाग, मनपा शिक्षण मंडळ त्यानंतर भविष्य निर्वाह निधी, लेखा, ठेव लेखा, अग्रीम लेखा आणि नगररचना विभागाचा काही पार्ट अशा या ५ ते ६ विभागाचे लेखा परिक्षण याअहवालात समावेश करण्यात आला आहे. यात प्रमुख मुददे या अहवालात नमुद आहे. या अहवालाचे ३ भाग केले असुन त्यामध्ये मे. स्थायी समितीमध्ये जे विषय आम्ही वेळोवेळी महत्वाचे असतात. ज्यावर कारवाई करणे तात्काळ अपेक्षीत असते असे विषय आहे. जे अहवालाच्या पार्ट अ मध्ये समावेश केलेले आहे.त्यानंतर नियमीत लेखापरिक्षण अहवाल दर्शविले आहे. ते पार्ट ब मध्ये समावेश केले आहे. आणि पार्ट क मध्ये मे. स्थायी समिती ज्यावेळेस काही विषयावर विशेष लेखा परिक्षण किंवा काही तपासणी लेखा परिक्षकांना सुचीत करते. त्याचा समावेश केला आहे. भाग ब मध्ये १ ते ३२ परिच्छेद यात समाविष्ट आहे. त्यात नगररचना विभाग -२ परिच्छेद त्यात बांधकाम परवानगी मंजुरी देतो व विकास शुल्क आकारतो. कामगार उपकर सुध्दा वसुल करतो. परंतु हा उपकर ऑनलाईन वसुल केला जातो. शासनाकडे खाते ओपन केले परत तो रिडायरेक्ट मनपाकडे येतो. आणि मनपाकडे ज्या उपकराच्या रकमा आहे त्या रकमा वर्षानुवर्षे अशाच पडुन राहिल्या आहे. परत आलेली रक्कम शासन खाती भरणे अपेक्षीत होते. त्यामुळे मनपाचे एक नुकसान असे की, जो उपकर वसुल करतो त्याचा १ टक्का रिबेट हा मनपाला मिळत असतो मनपाचा हक्काचा पैसा असतो. परंतु हया रकमा शासनखाती न भरल्यामुळे रिबेट आपल्याला वापरता येत नाही. आणि शासकीय रकमा आपल्या खात्यात पडुन आहे.तसेच भविष्यनिर्वाह निधी संदर्भात परिच्छेद आहे. यात बरेचशे कर्मचारी वर्ग – ४ चे आहे. त्यांच्या निधी वरचे संचित व्यापारी गणना होतांना दिसत नाही. ज्यावेळी एखादा कर्मचारी रिटायर्ड होतो त्यावेळी त्या कर्मचाऱ्याला जी रक्कम त्या तारखेपर्यंत शिल्लक होती त्या तारखेपर्यंत व्याज देण अपेक्षीत आहे परंतु ते व्याज गणना न करता त्यांच्या मुळ रक्कमा परत केल्या आहे. असे काही महत्वाचे परिच्छेद यात आहे. बाजार वसुली विभागाकडे तिकीटांचा हिशोब आपलयाकडे घेतला जात नाही. समजा १०० तिकिट दिली तर १०० तिकिट परत आली का याचा ताळमेळ होत नाही. यात बऱ्याचशा रकमा प्रलंबीत आहे. सन २०२३-२४ ऑडीटमध्ये ५५००० रुपयांचा फरक आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सो. बाजार फी संदर्भात सुडके साहेबांशी बोलुन घ्या. त्यांचा आक्षेप काढुन फायदा नाही त्याचे कम्पलायन्सेस होता का याचा देखील आपण पाठपुरावा करावा. यामुळे मनपाचा आर्थिक गणिते बिघडतात. सगळया विभाग प्रमुखांनी वार्षिक लेखा परिक्षणाचा अहवाल तपासुन घ्यावा. तसेच गाळयांचे भाडे संदर्भात मोठा विषय आहे. २१० पेक्षा जास्त मनपाचे गाळे आहेत. पण त्याचा रेव्हेन्यु वर्षापासुन अडकलेला आहे. करारनामे अडकलेले आहे. त्यावेळीस ठरावानुसार डबल आकारणी व त्याचे हिशोबाने दिले गेलेली बिले आज त्याला सेटलमेंट करण किंवा त्याला वेव ऑफ करण्याची प्रोव्हीजन मनपाकडे नाही. जी रेज केलेली बिलाची रक्कम जोपर्यंत वसुली होत नाही तोपर्यंत मुलेप नी काढलेला परिच्छेद तसाच राहणार आहे. सुडके साहेबांकडुन हे कम्पलायन्सेस पुढील २-४ महिन्यात करावे लागतील. मुख्यमंत्री महोदयांनी १५० दिवसांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यात यातील देखील विषय आहे. या सगळया गोष्टींवर फोकस करावा. प्रत्येकाशी रिलेटेड जे विषय आहे. अॅडीशनल कमिशनर, डेप्युटी कमिशनर, असिस्टंट कमिशनर यांनी त्याचे कम्पलायन्सेस करावे. आणि वेळेत हे पुर्ण केले पाहिजे याची काळजी घ्यावी.

मा.मुख्य लेखा परिक्षक याच अनुषंगाने आणखी एक विषय आहे. प्रॉपर्टी टॅक्सचे अकाऊंट एचडीएफसी बँकेत आहे, आणि आपला ग्रह असा की एचडीएफसी बँक आपल्याला मोफत ही सुविधा पुरवत आहे. यात

असे निदर्शनास आले की, अकाऊंट चे स्टेटमेंट पाहिले तर त्यात बऱ्याचश रकमा अशा आहेत की त्या एचडीएफसी बँकेने परस्पर खर्ची टाकलेल्या आहे. प्रॉपर्टी टॅक्सचा पैसा जिथे जमा होतो त्या अकाऊंट मध्ये त्या रकमांचा कुठेही ताळमेळ नाही. या रकमा आम्ही रिपोर्ट मध्ये नमुद केल्या आहे. त्या रेक्टीफाय झालेल्या नाही,याचा रिव्हयु घेणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता हा पुर्ण रिपोर्ट सर्व विभागांनी पहावा. आणि एचडीएफसी संदर्भात आपण आणि मुख्य लेखाधिकारी एकत्र बसल्यावर जेव्हा रिकन्सीलेशन कराल जमा खर्चाचे तेव्हा लक्षात येईल . तस बँकेला कळवा. बँकेचे ॲग्रीमेंट किती दिवसाचे आहे, ते किती दिवस सेवा देणार हे पण पाहुन घ्या. फक्त प्रॉपर्टी टॅक्स नाही तर जेवढे ऑनलाईन सेवा असेल BPML रिलेटेड असेल. देशमुख साहेबांच्या काळापासुन चालु आहे त्याचे कन्व्हर्जन तेव्हापासुन त्याचे नॉर्म ठेवुन केले असेल तेव्हाचे एशियन टेक बरोबर झालेले ॲग्रीमेंट हे सगळ एकदा तपासुन घ्या. देशमुख साहेबांच्या काळातील ॲग्रीमेंट ते सर्व कागदपत्रे पाहुन घ्या.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३६ दिनांक ०१/०८/२०२५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील लेख्यावरील लेखापरीक्षण अहवाल (भाग-१/२) स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करणे करीता अग्रेषित करण्यात येत आहे. धुळे महानगरपालिका, धुळे यांच्या सन २०२३-२०२४ या वर्षाचे लेखापरीक्षणाचा अहवाल भाग-१/२ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०६ (३) चे तरतुदीनुसार मे. स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना माहे नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ हा अल्प कालावधी व लेखापरीक्षणाचे कामकाजाकरीता उपलब्ध अप्रशिक्षीत अपूरा कर्मचारी वर्ग या अडथळयासह सन २०२३-२०२४ या वर्षाच्या सर्व विभागांचा, एकत्रित लेखापरीक्षण अहवाल सादर न करता या कालावधीत लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या महानगरपालिकेचा बाजार विभाग, भविष्य निर्वाह निधी लेखा, ठेव लेखा, अग्रीम लेखा, महानगरपालिका, शिक्षण मंडळ व नगर रचना विभागाचे लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यात आला आहे. यापैकी नगर रचना विभागाच्या लेखापरीक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

त्यामुळे सन २०२३-२०२४ या वर्षाच्या सर्व विभागाचा लेखापरीक्षण अहवाल स्थायी समितीस सादर न करता लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या व प्रगती पथावरील लेखापरीक्षणातील निष्कर्षाचा लेखापरीक्षण अहवाल भाग - १ सादर करण्यात येत असुन सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात सन २०२३-२०२४ या वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालाचा उर्वरीत भाग-२ सादर करण्यात येईल.

लेखापरीक्षणात निर्देशनास आलेल्या ठळक बाबी अधिनियमातील तरतुदीनुसार त्या त्या वेळी मे. स्थायी समिती व आायुक्त यांचे निर्देशनास आणुन देण्यात आलेल्या असुन त्यांचा समावेश या अहवालाच्या भाग-अ मध्ये करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, मुख्य लेखापरीक्षकांचा सन २०२३-२४ भाग एक यास मान्यता देण्यात येत आहे.

मुख्य लेखापरीक्षकांच्या सदर अहवालातील भाग एक मधील सर्व बाबी व आक्षेप संबंधीत विभागप्रमुखांनी तपासून घ्यावे. तसेच या संदर्भात तातडीने अनुपालन तथा आवश्यक ती पूर्तता व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधीत विभाग प्रमुखाची राहील. लेखा परीक्षण विभागाने सर्व संबंधित विभागांस लेखा आक्षेपांचे अनुपालन करण्या संदर्भात आवश्यक ते मार्गदर्शन समन्वयाने करावे. अति. आयुक्त तसेच उपायुक्त व सहा. आयुक्त यांनी आपल्या

नियंत्रणातील विभागामार्फत या संदर्भातील कार्यवाही पूर्ण करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५५९ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2024-25 अंतर्गत प्र.क्र 05 अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे (गुरुदत्त कॉलनी) कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र. ५ अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे (गुरुदत्त कॉलनी) बाबत कामास रु. २९९६१२५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. ई निविदा मागविणेत येवुन त्यात ४ निविदा धारकांनी भाग घेतला होत. त्यात मे. गिरीष चिंतामण मराठे याची आलेली आहे. शे. -६.०१ टक्के कमी दराने आले आहे. दर मंजुरीस्तव विषय सादर झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सो. या कामाला उशिर का झाला. यात ३० टक्के मनपा हिस्सा भरावयाचा आहे. याबाबत तपासून घ्या तोपावेतो प्रस्ताव तहकूब ठेवा.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३७ दिनांक ०१/०८/२०२५

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2024-25 अंतर्गत प्र.क्र 05 अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे (गुरुदत्त कॉलनी) बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/1053/2024-25 दि.07/10/2024 यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 29,96,125/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.गिरीष चिंतामण मराठे** यांचे दर **शे.-६.०१ % कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.गिरीष चिंतामण मराठे** यांची **शे.-६.०१ % कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, सदर प्रस्ताव विलंबाने मान्यतेसाठी सादर झालेला आहे. याबाबत खात्री करुन पुनश्च प्रस्ताव सादर करावा. तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५६० स्वच्छ भारत अभियान अंतर्गत क्षमता बांधणी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी वाटाघाटी अंती सादर केलेले दर मंजुरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपायुक्त स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ६७ लाखाचा निधी प्राप्त झाला होता. त्यातील १५ लाख बाजुला ठेवुन उर्वरीत रक्कमेची निविदा प्रकिया केली होती. त्यात ४ निविदा धारकांनी भाग घेतला.

त्यात मे. ऑरलेट टेक्नॉलॉजिस प्रा. लि. मुंबई यांची निविदा एल-१ आलेली आहे. त्यांनी एकुण ४४,९६,५००/- दर निविदेत सादर केले होते. त्यांना वाटाघाटीसाठी पत्र दिले असता त्याने ४४,४४,२५०/- मान्य केले. परंतु पुन्हा वाटाघाटीसाठी बोलावले असता ते रु. ४४,००,०००/- मध्ये काम करण्यास मान्य केले आहे. तसे पत्र दिले आहे. तरी सदरील विषय मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यातील कामे प्रॉपर पध्दतीने करावे.

मा. उपायुक्त — ज्या नगरपालिकेने व महानरगपालिकेने चांगले काम केले आहे त्यांचे अभ्यास दौरे आहे. एस आय तसेच संबंधीत कर्मचारी यांना आपण पाठवणार आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक — अंबिकापुर, छत्तीसगड येथे पाठवा. आपल्या लोक संख्येइतकी लोकसंख्या आहे. त्यांची एका टिम सोबत मॅडमांना पाठवा व एका टिमसोबत तुम्ही स्वत: जावे. तसेच इतरत्र कचरा टाकणाऱ्यांकडे लक्ष द्यावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३८ दिनांक ०१/०८/२०२५

क्षमता बाधणी (Capacity Building) या घटका अंतर्गत स्वच्छता विभागाकडील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे क्षमता बांधणी विकास, वर्तनात बदल इ. कामासाठी धुळे महानगरपालिकेच्या मंजूर घटकातील क्षमता बाधणी अंतर्गत स्वच्छता विभागाकडील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे क्षमता बांधणी विकास, वर्तनात बदल इ. कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचना क्र.१७२ सन २०२४-२५ प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर ई-निविदेत एकुण ४ निविदा धारकांनी सहभाग घेतला असता त्यात सर्वात न्युनतम दर मे.ऑरनेट टेक्नॉलॉजीस प्रा.लि.नवि मुंबई यांचे कार्यक्रमनिहाय प्राप्त झालेले होते.

सदरचे दर बाजारभावानुसार व इतर महानगरपालिकेचे उक्त कामी दर पहाता मा.उपायुक्त सो. यांनी सदर संस्थेस वाटाघाटी करीता कळविण्याबाबत निर्देश दिले होते. मे.ऑरनेट टेक्नॉलॉजीस प्रा.लि.नवि मुंबई यांना उक्त सादर केलेल्या दरात वाटाघाटी करीता बोलविण्यात आले होते.

दिनांक २२/७/२०२५ रोजी ई-निविदेत सादर केलेल्या दरात वाटाघाटी करुन व विभागामार्फत कार्यक्रमांमध्ये अंशत बदल करुन प्रस्तावात नमूद अनु क्र. १ ते १७ बाबींसाठी नविन दर व कार्यक्रमांची संख्या सादर करुन त्यात काम करण्यास संमती दर्शविलेली आहे.

ई-निविदेत सादर केलेले एकुण दर :- रु.४४,९६,५००/-
वाटाघाटी अंती सादर केलेले एकुण दर :- रु.४४,००,०००/-

त्याअनुषंगाने सदर दर योग्य वाटत असल्याने उक्त दर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत क्षमता बांधणी कार्यक्रमा अंतर्गत प्रस्तावात नमूद अनुक्रमांक १ ते १७ बाबींसाठी मे.ऑरनेट टेक्नॉलॉजीस प्रा.लि.नवि मुंबई यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर एकुण रुपये **४४,००,०००/- मात्रला** मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५६१ — धुळे महानगरपालिका आरोग्य विभागासाठी संगणक व ऑल इन वन प्रिंटर मशीन खरेदसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.प्र. भांडारपाल धुळे मनपाकडे आरोग्य विभागासाठी संगण व ऑल इन वन प्रिंटर मशीन खरेदी करणेकामी पत्र प्राप्त झाले होते. सदरचे काम तातडीचे असल्याने सदर काम मिनीटेक सिस्टीम प्रा. लि. यांच्याकडुन करुन घेण्यात आले. मे. स्थायी समितीसमोर विषय मान्यतेसाठी सादर.

मा.उपायुक्त पुढील सभेत ई ऑफिस संदर्भात विषय ठेवणार आहेत. सर्व विभागप्रमुखांना आय पॅड देणार आहेत. दिवसभरात नसेल जमले तर घरी जाऊन त्या त्या फाईल क्लीअर करणे शक्य होईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक ई ऑफिस प्रणाली लवकर सुरु करावी.एक पण लेआऊट व एक पण बिल्डींग परमिशन ऑफलाईन होणार नाही याची दक्षता घ्यावी. सर्व ऑफलाईन फाईल ऑनलाईन मुव्ह करावे. येतया १५-२० दिवसात ई ऑफिस सुरु करण्यावर भर द्यावा लागेल. साबळे याबाबत प्रत्येक विभागाचे काय स्टेटस आहे. सर्वांच्या ई सिग्नेचर कोणाचे बाकी आहे का, लॉग ईन आय डी पासर्वडला काही इश्यु आहे काय ते पहावे. तसेच जाणारे पत्र देखील ई ऑफिस मधुन गेले पाहिजे. तसेच आदेश देखील डिजीटली साईन होवु जातील. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३९ दिनांक ०१/०८/२०२५

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागासाठी संगणक व ऑल इन वन प्रिंटर मशीन खेरीदी बाबत पत्र प्राप्त झालेले आहेत. त्याअनुषंगाने सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत MiniTek System (I) Pvt ltd त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले आहे सदरचे काम हे मजुरी चे असल्याने GST कर यांना लागु होत नसुन यांचे कुठलेही कर न कापता त्या अन्वये सदरच्या सेवाधारकां कडील बिलाप्रमाणे सर्व खर्चासोबत एकूण रुपये **६,५८,९५१/-**मात्र खर्च सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव निर्णयाकरीता मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगरपालिका आरोग्य विभागासाठी संगणक व ऑल इन वन प्रिंटर मशीन खरेदसाठी झालेला खर्च रुपये **६,५८,९५१/-** मात्रला महाराष्ट्रा महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) नुसार कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५६२ धुळे महानगरपालिका ई ऑफिस वापर प्रणाली कार्यान्वित करणेसाठी संगणक व ऑल इन वन प्रिंटर मशीन खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. आयुक्त तथा प्रशासक हे सगळे मुल्यांकन करा. या व्यतिरीक्त लागणाऱ्या गोष्टी निकम साहेब व मॅडम सोबत को ऑर्डीनेट करुन संपवुन घ्यावे.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४० दिनांक ०१/०८/२०२५

धुळे महानगरपालिका ई ऑफिस वापर प्रणाली कार्यान्वित करणेसाठी संगणक व ऑल इन वन प्रिंटर मशीन खेरीदी बाबत पत्र प्राप्त झालेले आहेत.

त्याअनुषंगाने सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत MiniTek System (I) Pvt ltd त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले आहे सदरचे काम हे

मजुरी चे असल्याने GST कर यांना लागु होत नसुन यांचे कुठलेही कर न कापता त्या अन्वये सदरच्या सेवाधारकां कडील बिलाप्रमाणे एकूणन खर्च रुपये **९,७८,१०२/-** मात्र सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी **मे.** स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगरपालिका ई ऑफिस वापर प्रणाली कार्यान्वित करणेसाठी संगणक व ऑल इन वन प्रिंटर मशीन खरेदीसाठी झालेला खर्च रुपये **९,७८,१०२/-** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) नुसार कार्योत्तर वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५६३ — सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. लेखापाल — सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखा संहिता १९७१ नियम ६० व नमुना क्र. २८ नुसार तयार केलेले असुन मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सर्व बाबी वेबसाईटवर प्रसारीत करा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४१ दिनांक ०१/०८/२०२५

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखासंहिता १९७१ नियम ६० व नमुना क्र. २८ नुसार तयार केलेले असून स्वाक्षरीसाठी सादर. तरी सदर लेख्यांचे सारांश स्वाक्षरी होऊन मे. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झालेला आहे. उक्त कार्यालयीन अहवालानुसार सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेख्यांना मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५६४ — धुळे महानगरपालिका अतिक्रमण विभाग कडील मोहिमेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. अतिक्रमण वि. प्रमुख — धुळे मनपा अतिक्रमण विभागाकडील मोहिम देवपुर, सुशीनाला, वडजाई रोड व ८० फुटी रोड येथे झाली. मोठया प्रमाणावर पोलिस बंदोबस्त व कर्मचारी उपस्थित होते. झालेल्या कारवाई साठी फुड पाकिट व चहा, पाणी बॉटल यावर झालेला खर्च मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४२ दिनांक ०१/०८/२०२५

धुळे महानगरपालिका अतिक्रमण विभाग कडील कार्यवाही मोहिम मधिल कार्मचारी यांना अल्पोहार चहा पाणी व्यवस्थाकरणेत आलेली आहे.त्यानुसार बाजारातुन दरपत्रक **हिन्दुस्थान एन्टरप्राइजेस,धुळे** यांचे कडुन दराचा तपास करून सदरचे दर GST कराचा समावेश करणेत येऊन एकूण रुपये ४८,४२७/- मात्र खर्च झालेला आहे. सदर प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे कार्योत्तर मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगरपालिका अतिक्रमण विभाग कडील मोहिमेकामी आलेल्या एकूण रुपये ४८,४२७/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-५६५ धुळे महानगपालिका क्रेडीट रेटींग करणेसाठी शासनमान्य संस्था नियुक्तीबाबत कार्योत्तर मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. लेखापाल धुळे मनपाला विकासात्मक कर्ज घेणे प्रस्तावित असुन सदरील कर्जाच्या अनुषंगाने credit rating करणे आवश्यक आहे. यासंदर्भा CRISIL RATING Ltd. यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी रेटींग संदर्भात झालेल्या चर्चेप्रमाणे credit rating करुन घेतले आहे. कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक हा निधी अमृत २.० मधुन च्या O & M ची जी कॉस्ट आहे त्यातुन तुम्ही खर्च करा अशा स्वरुपाचे केंद्र शासनाचे पत्र आहे. त्यामुळे हे सर्व तयार करुन याचा निधी मागणीचा प्रस्ताव शासनास पाठवुन द्यावा.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४३ दिनांक ०१/०८/२०२५

शहरी स्थानिक संस्थांना (ULBs) क्रेडिट रेटिंगची उपलब्धता ही त्यांना बाजार-आधारित वित्तपुरवठा करण्यास सक्षम करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ULB ची क्रेडिट पात्रता त्याचे आर्थिक आरोग्य, कार्यात्मक कार्यक्षमता आणि प्रशासन क्षमता प्रतिबिंबित करते, जे कर्जदात्याला दिलासा देण्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत. त्या अनुषंगाने धुळे महानगरपालिका धुळे. आयुक्त सो तथा प्रशासक यांनी दिलेल्या मौखीक आदेशानुसार, धुळे महानगरपालिका धुळे महानगरपालिकेचे रुपये ३५०.०० कोटीचे विकासत्मक कर्ज घेणे प्रस्तावित असुन सदरील कर्जाच्या अनुषंगाने Credit Rating करणे आवश्यक आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिकेचे Credit Rating करणे करिता CRISIL Rating Limited यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सदरील Rating संदर्भात झालेल्या चर्चे प्रमाणे खालील तक्त्यात नमुद नुसार खर्च अपेक्षीत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	एकुण खर्च १८% GST सह
१	धुळे महानगरपालिकेस घ्यावयाचे कर्ज रुपये ३५०.०० कोटी बाबत Credit Rating स्वतंत्र स्वरुपात करणे	१०,३२,५००/-
२	धुळे महानगरपालिकेचे आर्थिक बाबींनुसार Corporate Credit Rating करणे.	४,१३,०००/-
३	सदर कामा करीता इतर खर्च	स्वतंत्र बिल सादर केल्या नुसार

सदरचा खर्च रुपये कार्योत्तर मंजुरी मिळणेस स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगपालिका क्रेडीट रेटींग करणेसाठी शासनमान्य संस्था CRISIL Rating Limited नियुक्ती व खर्चास महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. याबाबत अमृत २.० अंतर्गत निधी मागणी प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे

तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.

सही/- x x x
अमिता दगडे-पाटील,
आयुक्त तथा प्रशासक,
धुळे महानगरपालिका,धुळे